आजचा शुभ विचार

"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-56 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Wednesday 02 July 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ५६ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ बुधवार, दि. ०२ जुलै २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये

## उत्तराखंडमध्ये अडकलेल्या मराठी बांधवांच्या मदतीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरसावले

### मराठी पर्यटकांशी फोनवरून संवाद साधत साधून त्यांना शक्य ती सारी मदत पोहचवण्याची ग्वाही

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



उत्तराखंडमध्ये अडकलेल्या मराठी पर्यटकांच्या मदतीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपला हात पुढे केला आहे. उत्तराखंडमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे भुस्खलनात रस्ते बंद झाल्याने अनेक पर्यटक तिथे अडकून पडले आहेत. ज्यामध्ये महाराष्ट्रातील एकूण २०० पर्यटक अडकले असल्याची बातमी आहे. ज्यामध्ये तब्बल १५० पर्यटक हे मराठी आहेत. या मराठी पर्यटकांपर्यंत मदत पोहचवण्याची विनंती एकनाथ शिंदे यांनी उत्तराखंडच्या मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

उत्तराखंडमध्ये गेल्या काही दिवसांपासून पावसाने थैमान घातले आहे. या ठिकाणी ढगफुटी सदृश पाऊस पडल्याने नद्यांना प्रचंड पूर आला आहे. ज्यामुळे भूस्खलन होऊन वाहतुकीचे रस्ते बंद झाले आहेत. ज्यामुळे हजारो पर्यटक या ठिकाणी गेले अनेक दिवस अडकून आहेत. ज्यात महाराष्ट्रातील पर्यंटकांचा देखील समावेश आहे. उत्तराखंडमधील यमुनोत्री धामच्या जानकीचट्टी गावात २८ जूनपासून सुमारे १५० मराठी पर्यटक अडकून पडले आहेत. त्यांच्या परतीच्या मार्गावर दरड कोसळून रस्ते वाहून गेल्याने परिस्थिती पूर्वपदावर येण्यासाठी अजून आठ दिवस लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपल्याला मदत करावी अशी मागणी मराठी पर्यटकांनी सरकारकडे केली होती. या मागणीची दखल घेऊन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पावसाळी अधिवेशनातील आपल्या व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढत उत्तराखंड येथे अडकलेल्या आकाश जाधव या पर्यटकासोबत फोनवरून संवाद साधला. यावेळी त्यांनी त्यांची विचारपूस करून शक्य ती मदत त्यांच्यापर्यंत नक्की पोहचवली जाईल असे सांगून त्यांना धीर दिला. तसेच कोणतीही मदत लागल्यास आपल्याला संपर्क करावा असेही सांगितले. यासोबतच उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांच्या मुख्यमंत्री कार्यालयात कार्यरत असलेल्या पराग दकाते यांच्याशी फोनवरून संवाद साधून या पर्यटकांना अन्न धान्य आणि आवश्यक ती मदत तातडीने पोहचवण्याची विनंती केली. याबाबत उत्तराखंड सरकारनेही सकारात्मक प्रतिसाद देत शक्य तेवढ्या लवकर रस्ता पूर्ववत करून अडकलेल्या पर्यटकांपर्यंत मदत पोहचवण्यात येईल असे सांगितले. सध्या परिस्थिती आटोक्यात आणण्याचे प्रयत्न उत्तराखंड सरकारकडून सुरू असून शक्य तितक्या लवकर महाराष्ट्रातील अडकलेल्या पर्यटकांपर्यंत पोहचून त्यांना परत पाठवण्याची व्यवस्था केली जाईल असे सरकारच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.




## आषाढी एकादशीला प्रवासी सेवेसाठी येणाऱ्या सर्व एसटी कर्मचाऱ्यांना मोफत भोजन व्यवस्था

### एसटी कर्मचाऱ्यांच्या जेवणाची व्यवस्था स्वखर्चाने करणार - प्रताप सरनाईक

राजेंद्र यादव
सोलापूर जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------





आषाढी एकादशी निमित्त श्री. क्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५२०० बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. ह्या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी तसेच या सर्वांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले, गेली कित्येक वर्ष विठुरायाच्या भक्तांची सेवा एसटी व एसटीचे कर्मचारी सातत्याने करत आहेत. ऊन, वारा पाऊस याची तमा न बळगता अतिशय निष्ठेने त्यांचे कर्तव्य ते बजावत असतात. आषाढी वारीच्या काळात त्यांच्या जेवणाची आबाळ होऊ नये, म्हणून यंदा स्वखर्चाने मी सलग तीन दिवस या सर्वांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था (एकादशीला उपवासाचे पदार्थ) करीत आहे. या निमित्ताने माणसातील " विठुराया" ची सेवा करण्याची संधी मला मिळत आहे. अर्थात, हे पुण्य पैशात मोजण्यासारखे नाही. त्यामुळे दरवर्षी अशा प्रकारचा उपक्रम मी राबवणार आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

आषाढी वारीच्या काळात ५,६ व ७ जुलै रोजी चंद्रभागा बसस्थानक, भिमा बसस्थानक, विठ्ठल बसस्थानक व पांडुरंग बसस्थानक येथे सुमारे १३ हजार एसटी कर्मचारी या मोफत भोजन व्यवस्थेचा लाभ घेतील.

## व्होट जिहादचे उत्तर हिंदूंनी एकत्रितपणे दिले : डॉ. विखे

अहिल्यानगर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------




आ. संग्राम जगताप हे एक हिंदुत्वाचा विचार आहे.त्यांना समर्थन देण्यासाठी आपण सर्वजण एकत्रित आलो आहे.माझ्या संकट काळामध्ये साथ देणारा सच्चा मित्र देखील आहे.अबू आझमीला बोलण्याची परवानगी असेल तर आ.संग्राम जगताप यांना हिंदुत्वावर बोलण्याचा हक्क आहे.महाराष्ट्रात संपूर्णपणे गोहत्या बंदी झाली पाहिजे आणि महिला सुरक्षित राहिल्या पाहिजे, यासाठी सर्वांनी एकत्रित येणे गरजेचे आहे.लोकसभेचे व्होट जिहादचे उत्तर विधानसभेत हिंदूंनी एकत्रित येऊन दिले आहेत,आपल्या जमिनी आणि मंदिरे आपल्या नावावर करण्यासाठी संघटित होऊन लढा देण्याचे काम आपल्या सर्वांना करावे लागणार आहे. मी आता हळूहळू हिंदुत्वाकडे चाललो आहे.आणि संग्राम जगताप माझ्यापुढे गेले आहे. आणि त्यांच्या पाठीमागे उभे राहण्याचे काम माझे आहे.असे प्रतिपादन खा.डॉ.सुजय विखे पाटील यांनी केले.छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आ.जगताप यांच्या समर्थनार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने महासभा संपन्न झाली.यावेळी खा.डॉ.विखे पाटील, ह भ प संग्रामबापू भंडारे,मंदार बुवा रामदासी अजिनाथ महाराज पालवे, राजेंद्र जंजाळ, रवी पडवळ,भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, माजी उपमहापौर गणेश भोसले,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर अध्यक्ष संपत बारस्कर,माजी सभापती अविनाश घुले,आदींसह सकल हिंदू बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.ह भ प संग्राम बापू भंडारे म्हणाले की, आ.संग्राम जगताप यांनी हिंदुत्वाचे काम सुरू केले असून त्यांना संपूर्ण महाराष्ट्रातून समर्थन मिळत आहे. जिहादी लोकांना आजहीअसे वाटते की काँग्रेस सरकार आहे. त्यांना माहीतच नाही आता हिंदूचे सरकार आले आहे. सागर बेग म्हणाले की, खासदार निलेश लंके हे मुल्ला असून त्याला संसदेत पाठवले आहे, जिथे जिथे गोरक्षकावर गुन्हे दाखल झाले आहे, तिथे या मुल्लाने पोलिसांना फोन केले आहे. या मुल्लाने संसदेमध्ये वक्त बोर्डच्या बाजूने मतदान केले आहे.

## म्हाडा छत्रपती संभाजीनगर, नाशिक मंडळातर्फे १४१८ निवासी सदनिका व भूखंडांसाठी सोडत

## सदनिका विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणीसह अर्ज भरणा प्रक्रिया सुरु

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------





म्हाडाचा विभागीय घटक छत्रपती संभाजीनगर व नाशिक मंडळाच्या अखत्यारीतील छत्रपती संभाजीनगर शहर-जिल्हा, बीड व नाशिक शहरामधील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत १ हजार ४१८ निवासी सदनिका व भूखंडांच्या ऑनलाइन संगणकीय सोडतीद्वारे विक्रीकरिता https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी आणि अर्ज भरणा प्रक्रियेचा 'गो लाईव्ह' शुभारंभ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आला. म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला मुख्य अभियंता धीरजकुमार पंदिरकर, छत्रपती संभाजीनगर व नाशिक मंडळाचे मुख्य अधिकारी शिवकुमार आवळकंठे आदी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे जाहीर सोडत तीन घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत १ हजार १४८ सदनिका, म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत १६४ सदनिका, २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत ३९ सदनिका/ भूखंडांचा समावेश आहे. तसेच नाशिक मंडळातील २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील ६३ सदनिका व म्हाडा गृहनिर्माण योजनेतील ४ सदनिकांचा सोडतीत समावेश आहे. या सोडतीत अत्यल्प उत्पन्न गटाकरिता ११४८ सदनिका, अल्प उत्पन्न गटाकरिता २६६ सदनिका, मध्यम उत्पन्न गटाकरिता ४ सदनिकांचा समावेश आहे.

छत्रपती संभाजी नगर व नाशिक मंडळाच्या संगणकीय सोडतीसाठी एकात्मिक गृहनिर्माण सोडत व्यवस्थापन प्रणाली म्हणजेच Integrated Housing Lottery Management System (IHLMS 2.0) या नूतन संगणकीय प्रणाली व ॲपवर सदनिकांच्या अर्ज नोंदणी प्रक्रियेस आज दुपारी १२.०० वाजेपासून प्रारंभ झाला आहे. छत्रपती संभाजीनगर व नाशिक मंडळाने जाहीर केलेल्या सदनिका विक्री सोडतीत सहभाग घेण्याकरिता दि. ११ ऑगस्ट, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहे. दि. ११ ऑगस्ट रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत अर्जदार अनामत रकमेचा भरणा ऑनलाईन करू शकतील. दि. १२ ऑगस्ट, २०२५ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत RTGS/ NEFT द्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येईल. अशाप्रकारे सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे अर्जदारच या प्रणालीद्वारे पात्र ठरविले जातील.

सोडतीसाठी पात्र अर्जांची प्रारूप यादी दिनांक दि. १८ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता 'म्हाडा' च्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता अंतिम पात्र अर्जांची यादी जाहीर केली जाणार आहे. सोडतीचे स्थळ व दिनांक मंडळातर्फे नंतर कळविण्यात येणार आहे.

संपादकीय

## हिंदी सक्ती आंदोलन; मुख्यमंत्र्यांनी हवाच काढली!

पहिलीपासून हिंदी मराठी विद्यार्थ्यांवर थोपणारा आदेश राज्य सरकारने रद्द केल्याची घोषणा केली आणि प्रादेशिक अस्मितेवरून आंदोलन करणाऱ्या शिवसेना उबाठा आणि राज ठाकरे यांच्या मनसे पक्षाच्या आंदोलनातील हवा काढली गेली. हिंदी सक्तीचा करणारा शासन निर्णय रद्द करत असल्याची घोषणा करून मुख्यमंत्र्यांनी एकाच तीरात अनेक पक्ष्यी गारद केले आहेत. कारण मराठीच्या सक्तीच्या मुद्द्यावर शिवसेना उबाठा गट आणि राज ठाकरे यांचा मनसे हे एकत्र येऊ पाहत होते. त्यांनी संयुक्त आंदोलनाची घोषणाही केली होती. त्यामुळे अनेक पत्रकारांना राज आणि उद्धव एकत्र आले तर राज्यात पुन्हा आपले चांगले दिवस येतील आणि त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा आपले हितसंबंध जपता येतील अशी स्वप्ने पडू लागली होती. राज्यात मराठी सक्तीची आहेच आणि महायुती सरकारातील मुख्यमंत्री किंवा दादा भुसे यांनी वारंवार हे सांगितले होते. पण शिवसेना आणि मनसे यांना ही भाजपा सरकारला खिंडीत गाठण्याची संधी वाटली आणि त्यांनी आंदोलन जाहीर केले. पण काल विधिमंडळ अधिवेशनाच्या अगोदर एक दिवस आधी मुख्यमंत्र्यांनी हिदी भाषा सक्तीचे परिपत्रक रद्द केल्याची घोषणा केली आणि उद्धव आणि राज यांच्या आंदोलनातील हवा काढून घेतली. आता त्यांच्या हातात दुसरे काही उरले नाही. आता ठाकरे बंधूंनी आम्ही उद्याचा दिवस विजय दिन म्हणून साजरा करणार आहोत असे सांगितले आहे. पण त्यातील हवा कधीच निघून गेली आहे.

वास्तविक २१ सप्टेंबर २०२१ रोजी ठाकरे सरकारनेच त्रिभाषा सूत्र धोरण स्वीकारले होते. पण आता ते आपल्याच निर्णयाच्या विरोधात आंदोलन करणार होते. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे यांना त्यांच्या निर्णयाच्या फोलपणाची जाणीव करून दिली आहे. आता आपली गेलेली अब्रू वाचवण्यासाठी ठाकरे बंधू एकत्र येऊन सभा घेतील अशी घोषणा ठाकरे यांनी केली आहे, पण त्यात काही अर्थ नाही. कारण मुळातच या मुद्द्यातील हवा निघून गेल्यावर किती शिवसैनिक (ठाकरेंचे) येतील याची शंकाच आहे. राज यांच्या मनसेने तर अद्याप यावर काहीही प्रतिक्रिया दिलेली नाही. खरे तर शिवसेना उबाठाची या संपूर्ण प्रकरणात चांगलीच फजिती झाली आहे. 'गिरे तो भी टांग उपर' या न्यायाने त्यांच्याकडून सध्याचा आव आणला जात आहे. हिंदी भाषेला विरोध करण्याचे काहीच कारण नाही. पण मराठी ही मायभाषा आहे आणि ती सक्तीची आहेच आणि कोणतेही सरकार मराठी भाषेला राज्यातून नेस्तनाबूत करू शकणार नाही. हेच फडणवीस यांनी वारंवार स्पष्ट केले आहे. पण समजून घ्यायचे नाही आणि आपलेच क्षुद्र अस्मितेचे राजकारण करत राहायचे याला सवंगलेले राजकीय पक्ष आपल्याच वळणावर जाणार यात काही शंका नाही, पण फडणवीस यांना ती संधीही मिळू नये याची दक्षता घेतलेली आहे. त्यामुळे राज आणि उद्धव यांच्यापुढे पुढे काय असा प्रश्न आहे. मराठी अस्मितेचे राजकारण करत शिवसेना (अविभाजित) सत्तेवर आली होती आणि राज्यात तिने चांगलेच यशही मिळवले. पण शिवसेना उबाठातील काही स्वार्थांध गटांना मराठी अस्मितेचे राजकारण करण्यातच रस होता. पण त्यांना या निवडणुकीत आणि देशपातळीवरही मतदारांनी चांगलाच धडा शिकवला. पण त्यातून धडा घेतील तर ते शिवसेना (उबाठा) कसले असा प्रश्न होता. अखेर फडणवीसांनी त्यांना त्याची जागा दाखवून दिली आणि आता हे दोघे बंधू किती जरी मराठीच्या अस्मितेचे राजकारणाचा विजय असे म्हणत असले तरीही ते तोंडघशी पडले आहेत हेच सिद्ध झाले. वास्तविक मराठी पहिलीपासून सक्तीची महाराष्ट्रात प्रथमपासून लागू आहे.

मराठी भाषेत शिक्षण दिले असता ते चांगल्या रितीने समजते असा त्यामागे युक्तिवाद केला जातो आणि विद्यार्थ्याला मराठीच नव्हे तर एकापेक्षा अधिक भाषा आल्या पाहिजेत म्हणून हिंदी शिकवले जाते. मुले मोठी झाल्यावर त्यांना हिंदी आणि त्यापेक्षा इंग्रजीत शिकवले नाही, तर ती मागे पडतील हा विचार यामागे होता. कोणत्याही सरकारचा विचार विद्यार्थ्यांचे कल्याण आणि त्याला सर्व भाषांचे शिक्षण मिळून तो जगात रोजगार मिळण्यास सक्षम व्हावा हाच असतो. पण ठाकरे आणि राज यांनी मराठी अस्मिता केंद्रस्थानी ठेवून या मुद्द्याचे राजकारण करण्याचा आणि भाजपाला घेरण्याचा प्रयत्न केला. विधानसभेत चांगलीच आपटी खाल्लेला पवारांचा राष्ट्रवादी गट आणि अन्य काही विरोधी पक्ष यात राजकारण करण्याची संधी आहे म्हणून या विषयावर एकत्र आले. शेवटी मुख्यमंत्री फडणवीस यांनी बाजी मारली आणि नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून त्रिभाषा सूत्र तपासेल आणि त्यांच्या अहवालावर पुढील निर्णय अवलंबून असेल. त्यामुळे महाराष्ट्राची एका अशा पर्वातून सुटका झाली आहे. कारण या मुद्द्याचे राजकारण किती दिवस चालेल हे सांगता येत नव्हते. अर्थातच उद्याचा मोर्चाही रद्द करण्यात आला आहे. दोन्ही ठाकरे बंधू हा आपला विजय असे समजत असतील तर हा त्यांचा भ्रम आहे. कारण मुळात हा मुद्दा नव्हताच. मुद्दा आहे तो विद्यार्थ्यांना वाचता येते की नाही आणि त्यात असर या संस्थेचा अहवाल जे सांगतो ते धक्कादायक आहे. या अहवालानुसार पाचवीतील विद्यार्थ्यांना मराठीतील काही शब्द वाचताही येत नाहीत आणि त्यांना मोठ्याने वाचणे तर दूरच, पण लिहिता येणे अवघड जाते. त्या बाबतीत ठाकरे बंधूंनी कधीही आंदोलन उभारल्याचे कधी आठवत नाही. केवळ राजकारणासाठी सोयीचे मुद्दे घ्यायचे आणि राजकारण करायचे यामुळे राज्याचा विकास कधीही होणार नाही. दोन दिवसांत या मुद्द्यावर ठाकरे गटाने भरपूर राजकारण करून घेतले. पण त्यांच्या भात्यातील बाण मुख्यमंत्र्यांनी काढून घेतला आहे आणि ते नुसतेच हाती रिकामे धनुष्यबाण घेऊन गर्जना करत आहेत. याला हास्यास्पद विनोदी प्रयोग म्हणतात आणि तो ठाकरे खासकरून उद्धव ठाकरे राज्यात जास्त करत आहेत. त्यामुळे ठाकरे सत्तेवर तर येणारच नाहीत पण मुंबई महापालिका वाचवू शकणार नाहीत.

## माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वाडीवऱ्हे शाळेतील शिपाई श्री. जालिंदरनाथ करंजे ( मामा ) यांचा सेवापूर्ती कार्यक्रम संपन्न

आप्पासाहेब सूर्यवंशी
वाडीवऱ्हे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



दिनांक ३० जून २०२५ रोजी समाज शिक्षण प्रसारक मंडळ खालप ता.देवळा जि. नाशिक संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वाडीव-हे शाळेतील आमचे सहकारी शिपाई श्री . जालिंदरनाथ सयाजीनाथ करंजे (मामा) हे नियत वयोमानानुसार वयाच्या ६० व्या वर्षी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त शाळेत त्यांचा सत्कार समारंभ ठेवण्यात आला होता .त्याप्रसंगी संस्थेचे आधारस्तंभ श्रीकृष्ण रामचंद्र सूर्यवंशी सर, मुख्याध्यापक श्री कापडणीस सर ज्येष्ठ शिक्षक व सर्व शिक्षिका यांच्या हस्ते मामांचा श्रीफळ कपडे साडी आणि भेटवस्तू देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला.मामांना भावी आयुष्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. कापडणीस सर आणि ज्येष्ठ शिक्षक श्री सूर्यवंशी के .एस.सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले,सर्व शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थ्यांनी मामाना सेवापूर्तीच्या शुभेच्छा दिल्या.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

## गोरेगाव तालुक्यात परिवर्त पैनलचा जल्लोष!

### दुर्गा भैय्या ठाकरे यांचा जीडीसीसी बँक निवडणुकीत दणदणीत विजय

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत

--------------------









गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत गोरेगाव तालुक्यातून परिवर्तन पॅनलचे उमेदवार दुर्गा भैय्या (दुर्गाप्रसाद) ठाकरे यांचा दणदणीत विजय झाला असून, गोरेगाव तालुक्यात या ऐतिहासिक यशाचं मोठं जल्लोषात स्वागत करण्यात आलं. तेरा वर्षांपासून न्यायप्रविष्ट असलेली ही निवडणूक अखेर 2025 मध्ये पार पडली. न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात निवडणुकीची प्रक्रिया पार पडली. त्यामध्ये गोरेगाव तालुक्याने परिवर्तनाच्या बाजूने कौल दिला. परिवर्तन पॅनल व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे ठाकरे यांचा विजय निश्चित झाला. दुर्गा भैय्या ठाकरे हे केवळ राजकीय नव्हे तर सामाजिक कार्यातही सक्रिय असून, त्यांच्या या विजयामुळे तालुक्यात नवचैतन्य निर्माण झालं आहे. "मी शेतकऱ्यांच्या हितासाठी लढत राहीन," असा विश्वास त्यांनी विजयानंतर व्यक्त केला. विजयानंतर गोरेगाव शहरात बसस्टॉपपासून दुर्गा चौकापर्यंत ढोल-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. हजारो कार्यकर्त्यांनी नाचगाण्याच्या जल्लोषात आपला आनंद व्यक्त केला. या ऐतिहासिक प्रसंगी डॉक्टर झामसिंग भाऊ बघेल, जगदीश यरोला, डोमा बोपचे, पी. जी. कटरे, गोपाल ठाकूर, संजय भगत, सी. टी. चौधरी, कैलास डोंगरे, युती बिसेन, टी बि कटरे, विजय राणे, राजकुमार गौतम, शशीभाऊ भगत, अरुण फाये, मदनलाल अटरे, विक्की बघेले, दीपम देशमुख, अजित टेंभरे, विशाल पटले, डोमेश चौरागड़े व इतर मान्यवर पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. या विजयामुळे गोरेगाव तालुक्यात परिवर्तनाचा नवा अध्याय सुरू झाला आहे, अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.





आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा पिंपळगाव ढगे येथे जोरदार स्वागत मा. सरपंच गणेशराव पा. ढगे यांच्या निवासस्थानी भेट दिली असता शाल व पुष्पहार घालून सत्कार करताना मा. नगरसेवक करीम शेठ, माजी सैनिक संजय पा.ढगे, ॲड संतोष पा.ढगे, अंकुश पा.ढगे, ज्ञानेश्वर पा.ढगे, माधव पा.काकडे, विठ्ठल पा.ढगे, गोविंद कोटे यांची उपस्थिती होती. गोविंद ढगे लोहा प्रतिनिधि दैनिक स्वराज्यदूत

## बांगलादेशात जुलैपासून सुरू होणार कांद्याचे निर्यात; जूटच्या वस्तूंवर घातली बंदी

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



बांगलादेशात यावर्षी कांद्याचे उत्पादन चांगल्या प्रकारे झाल्याने भारतातील कांद्याला मागणी तिथे पूर्णपणे नसून अजून दोन आठवडे कांदा त्यांच्या बाजारपेठेत पुढील नंतर मात्र भारतातून कांद्याची आवक वाढेल. भारतातून दरवर्षी सर्वाधिक कांदा बांगलादेशात निर्यात होत असतो. दुसरीकडे भारत सरकारने बांगलादेश मधून झूट विनकामाचे वस्त्र, जूटचे धागे यासारख्या वस्तूंच्या रस्ता मार्गे आयातीवर तातडीने बंदी घातली आहे. जुलैपासून बांगलादेशात होणाऱ्या कांद्या निर्यातीसाठी बुकिंग सुरू झाली आहे. विन कामाच्या वस्तू आता व्हाया सेवा बंदर इथूनच भारतात येऊ शकतील.

## एक मुलगी शिकली तर दोन्ही घराचा उद्धार होतो. - सुरेश पवार

### येवल्यात गुणगौरव सोहळ्याचे आयोजन

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-------------------------



समाजात जे जे चांगलं घडतं त्यांचा सन्मान करणं हे आपलं आद्य कर्तव्य आहे. एक मुलगी शिकली तर दोन्ही घराचा उद्धार होतो म्हणून मुलींनी शिकून पुढे आलं पाहिजे. विविध स्पर्धा परीक्षेत उज्वल यश संपादन केले पाहिजे, असे प्रतिपादन अध्यक्ष सुरेश पवार यांनी केले.

गिरणा गौरव प्रतिष्ठान संचलित गिरजा महिला मंचातर्फे दहावी आणि बारावी विद्यार्थिनींच्या गुणगौरव सोहळ्यात ते बोलत होते. आपण समाजाचे काहीतरी देणं लागतो ही भावना मनात असली पाहिजे. देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे. ही आपली संस्कृती आहे. असेही मत यावेळी सुरेश पवार यांनी व्यक्त केले. विद्यार्थीदशेतच कर्तुत्वाचा सन्मान झाला की, पुढे यश संपादनासाठी ते अधिक प्रेरणादायी असते, असे मत गिरजा महिला मंचच्या जिल्हाध्यक्षा शितल कुयटे यांनी व्यक्त केले. निस्वार्थीपणे तालुक्यातील सर्व मुलींचा गुणगौरव सोहळा आयोजित केल्याबद्दल तसेच या सेवाभावी कार्याबद्दल गिरणा गौरव प्रतिष्ठान तसेच गिरजा महिला मंचाचे आभार मुक्तानंद शाळेचे प्राचार्य अरुण विभुते यांनी व्यक्त केले. ध्येय उंच असेल तर यशाचे शिखर गाठण्यास वेळ लागत नाही. त्यासाठी झपाटून अभ्यास करणे महत्त्वाचे आहे असे मत गिरणा गौरव प्रतिष्ठान संचालक कवी रतन पिंगट यांनी व्यक्त करून स्त्रीजाणिवेची धुणं कविता उपस्थितांपुढे सादर केली. यावेळी माईंड पॉवर ट्रेनर विलास दिघे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी कापसे उद्योग समूहाच्या संचालिका वंदना कापसे, एंझोकेम शाळेचे मुख्याध्यापक दत्तकुमार उटावळे, बालविकास प्रकल्प अधिकारी वंदना शिंपी, गिरजा महिला मंच तालुका अध्यक्षा पूनम दुकळे, उपाध्यक्षा संगीता महाजन, सचिव जयश्री राठोड, संचालक योगिता सोनवणे, विजया हिरे, किशोरी नाकोड, रेखा बाविस्कर, कावेरी दांडगे, सविता शिरसाट, रंजना मडके, सोनाली आळंदीकर, शिवाली सांगळे, स्वाती वारुंगुळे, अश्विनी पगारे, प्रियंका ससे,अंजली तांबे यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी कापसे उद्योग समूहाचे संचालक बाळासाहेब कापसे यांचे विशेष सहकार्य लाभले. सूत्रसंचालन रेखा बाविस्कर, सविता शिरसाठ यांनी केले तर आभार संगीता महाजन यांनी मानले.

# त्रिभाषा धोरणाचा जीआर काढणे आणि रद्द करणे हा तर सरकारचा राजकीय डाव!

हिंदी सक्तीच्या जीआर वरून असे लक्षात येते की याचा राजकारणावर काय परिणाम पडू शकतो किंवा याचा फायदा येणाऱ्या निवडणुकीत आपल्याला किती आणि कसा घेता येईल यावर सत्ताधाऱ्यांचे लक्ष असावे.त्याचप्रमाणे सरकारने हिंदी सक्तीचा जीआर आणताच विरोधीपक्ष एक्टीव्ह मोडमध्ये आला आणि विरोधकांची मोर्चेबांधणी सुरू झाली.याच निमित्ताने दोन्ही ठाकरे गट एकत्र आल्याचे पाहून आणि ५ जुलैला मोर्चा निघणार सोबतच संपूर्ण विरोधी पक्ष एकवटल्याचे पाहून आपल्या सरकारवर हिंदी भाषेच्या सक्तीचा विपरित परिणाम होऊ शकतो आणि महायुतीमध्ये सुध्दा यावर एकमत दिसत नसल्याने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने त्रिभाषा धोरणाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात दिनांक १६ एप्रिल २०२५ आणि १७ जून २०२५ रोजी काढण्यात आलेले दोन्ही शासन निर्णय दिनांक २९ जूलै २०२५ ला रद्द करण्यात आले.यामुळे भाषा विवाद सध्याच्या परिस्थितीत निवळल्याचे दिसून येते.प्रथम हिंदीचा जीआर काढणे आणि नंतर सारवासारव करण्यासाठी जीआर रद्द करणे ही तर हेतूपुरस्सर राजकीय हेतूने मराठी माणसाची फसवणूकच म्हणावी लागेल. सरकारला हिंदी सक्तीचा जीआर काढण्याची काय गरज होती.आपण महाराष्ट्रात राहातो मग अचानक हिंदी भाषेचा लाड सरकारच्या हुदयात कसा काय उफाळून आला! असे अनेक प्रश्न आज मराठी माणसाच्या मनात भेडसावत आहे. यावरून स्पष्ट होते की सरकार मराठी माणसामध्ये फुट पाडण्याचा तर प्रयत्न करत तर नाही ना!असाही प्रश्न निर्माण होतो आहे.राज्यात गेल्या आठवड्यापासुन हिंदी व मराठी भाषेचा रणकंदन सुरू होते. परंतु मराठी माणूस एकवटल्याने सरकारला झुकावे लागले व हिंदी सक्तीचा जीआर सरकारला रद्द करावा लागला.परंतु यात सरकारकडुन राजकारण झाल्याचे अवश्य दिसून येईल.कारण राज्य सरकारने कोणाच्या तरी दबावाखाली हिंदी भाषेच्या सक्तीचा निर्णय घेतला असावा असाही कयास लावला जात आहे.कारण राज्यात पुर्वी त्रिभाषीक पध्दत होती तीच योग्य होती ही बाब आता स्पष्ट दिसून येते. देशातील कोणतेही राज्य असो प्रथम प्राधान्य मातृभाषेलाच हवे. त्यानंतर राष्ट्रीय भाषा आणि त्यांच्या नंतर इंग्रजी किंवा इतर भाषेला प्राधान्य द्यायला हवे.आतापर्यंत मातृभाषा, राष्ट्र भाषा व नंतर इंग्रजी किंवा इतर भाषा असा क्रम पुर्वी पासुनच आहे आणि त्याचे महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यांनी सुध्दा स्विकारले आहे.राज्यात हिंदी भाषेचा विरोध मुळातच नाही. परंतु राजकीय पुढारी राजकारणाला वेगळे वळण देण्यासाठी विद्यार्थ्यांना हिंदी भाषा वेळेच्या आधी सरकार लादण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.आज देशाची उपराजधानी व औद्योगिक राजधानी म्हणून मुंबई ओळख जगभर आहे ही बाब जगजाहीर आहे. परंतु परप्रांतीयांनी मुंबईमध्ये जनुकाय मराठी भाषेवर आक्रमक केले की काय असे वाटत आहे.कारण बॉलीवूड क्षेत्र आणि हायप्रोफाइल मध्ये वावरणारे जास्तीत जास्त लोक इंग्रजी भाषेचा वापर करतात आणि परप्रांतीय लोक हिंदी भाषेचा वापर करून मराठी भाषेला डावलण्याचा प्रयत्न करतात.यामुळे याचा विपरीत परिणाम मराठी भाषेवर व मराठी माणसावर मोठ्या प्रमाणात होतांना दिसतो.पुर्वी पहिली ते चौथी पर्यंत हिंदी भाषेची सक्ती नव्हती. हिंदी विषय हा पाचवीपासून सुरू व्हायचा म्हणजेच मातृभाषा परीपक्व झाल्यानंतर हिंदी भाषेचा व इतर भाषेचा विचार केला जात असे.परंतु सरकार राज्यात पहिलीच्या वर्गापासून त्रिभाषा सूत्र अवलंबून हिंदी भाषेची सक्ती आणण्याचा प्रयत्न करीत होती.परंतु सरकारचा डाव फसला आणि याचा सर्वच स्तरातून मोठ्या प्रमाणात विरोध झाल्याने सरकारला झुकावे लागले व त्रिभाषा धोरणाचे दोन्ही जीआर रद्द करावे लागले.कारण सरकारच्या या धोरणामागे एकच उद्देश असावा तो म्हणजे हिंदी भाषीक परप्रांतीयांना राज्यात उद्योग धंद्यामध्ये चालना मिळावी.आज राज्याच्या प्रत्येक मुलांना वयाच्या दहा वर्षांपर्यंत मातृभाषेचे संपूर्ण ज्ञान अवगत असायलाच हवे तेंव्हाच मातृभाषा परीपक्व होईल.जर हिंदी पहिल्या वर्गापासून लादली तर मातृभाषेवर याचा विपरीत परिणाम अवश्य होईल. पहिलीपासून मुलांना मराठी शिकवावे, त्यांना मराठी लिहिता, वाचता यावे.ज्यावेळेस मुले पहिलीपासून मराठी लिहायला, वाचायला शिकतात तेव्हा हिंदीही आपोआप लिहिता वाचता येते ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.राज्यात अनेक ज्वलंत प्रश्न आहेत ते बाजूला सारून नव्याने भाषा वाद निर्माण करून आणि त्याचा राज्यातील जनतेचा मोठ्या प्रमाणात विरोध पहाता हिंदी सक्तीचा जीआर रद्द करावा लागला.कारण राज्याच्या जनतेला सरकारने व्दीधेत टाकून ज्वलंत प्रश्नांवर सरकार पडदा टाकत आहे की काय असे चित्र दिसत होते. आता जीआर रद्द झाल्यानंतर समिती गठीत करण्याची काहीच आवश्यकता नव्हती.कारण महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणुस पहिली पासून हिंदी किंवा इतर भाषा स्विकारणार नाहीच त्यामुळे सरकारने स्थापन केलेली डॉ.नरेंद्र जाधव समिती स्थापन करून त्यांच्या अहवालाची काहीही गरज नाही कारण हा अहवाल मराठी माणुस स्विकारणार नाहीच.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत जे शैक्षणिक धोरण आहे ते अमलात राहु द्यावेत यात कोणत्याही प्रकारची तडजोड किंवा बदल नकोच.या भाषा वादामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाचा जय विजय झाला नसुन फक्त मराठी माणसाचा विजय झाला आहे.जय महाराष्ट्र!

-------------------------------------

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर.

# कर्मवीर आ.मा. पाटील महाविद्यालयात "अमली पदार्थ विरोधी दिन साजरा"

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



महाविद्यालयीन तरुणांनी अंमली पदार्थांच्या सेवनाने होणारे दुष्परिणाम आणि अवैध तस्करीमुळे समाजावर होणारा नकारात्मक परिणाम लोकांपर्यंत पोहोचवणे आणि चांगली सुसंस्कृत पिढी घडविणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन पिंपळनेर पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय संसारे यांनी केले. पिंपळनेर येथील कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालय आणि पिंपळनेर शहर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने "आमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त" आयोजित कार्यक्रमात पिंपळनेर वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. बी. पवार, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पिंपळनेर शहर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक संजय संसारे, वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एल.जे गवळी,डॉ. नितीन सोनवणे, डॉ. संजय तोरवणे, आयक्युएसी संयोजक डॉ. संजय खोडके, प्रा.डॉ.सतीश मस्के,प्रा. मनोज बळसाणे, डॉ. आनंद खरात, डॉ. योगेश्वर नांद्रे, प्रा. सी. एन. घरटे, प्रा. डी. बी. जाधव, महाविद्यालयाचे शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

पुढे पिंपळनेर चे पी.एस.आय. संजय संसारे यांनी सांगितले की तरुणांना या निमित्ताने जागृती करून व्यसनांपासून दूर ठेवण्यासाठी हा दिवस साजरा करणे सामाजिक हिताचे आहे. म्हणूनच संपूर्ण जिल्हा पोलीस प्रशासनाने याबाबत जनजागृती करण्याचे आवाहन केले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष पिंपळनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लहू पवार यांनी अंमली पदार्थांच्या सेवनाने होणारे गंभीर दुष्परिणाम आणि त्याचे व्यसन कसे लागते, व संपूर्ण आयुष्य ही तरुण पिढी कशा पद्धतीने बरबाद करते याबद्दल महाविद्यालयीन तरुणांनी व्यसनमुक्तीसाठी आणि आरोग्य स्वास्थ्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. एल. जे.गवळी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ संजय तोरवणे व आभार डॉ.नितीन सोनवणे यांनी मानले.




# डिझाईन मास्टर स्पर्धेत MET BKC च्या विद्यार्थ्यांचा उल्लेखनीय यश

## प्रगतशील शेतकऱ्याचा मुलगा उज्वल शरद अहिरराव याने दुसऱ्या क्रमांकावर विजय

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------




डॉ. व्ही. बी. कोलते कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, माळकापूर येथे नुकतीच Tech Tantra या राष्ट्रीयस्तरीय तांत्रिक महोत्सवांतर्गत Design Master स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत साक्री तालुक्यातील धाडणे गावचे प्रगतशील शेतकरी शरद अहिरराव यांचे सुपुत्र उज्वल अहिरराव, तसेच प्रणव कुटे आणि आदित्य कापसे (सर्वजण MET भुजबल नॉलेज सिटी, नाशिक – तृतीय वर्ष अभियांत्रिकी) यांनी द्वितीय क्रमांकाचे पदक मिळवून महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली. विशेष म्हणजे, या विद्यार्थ्यांनी कोणताही व्यावसायिक डिझाईन कोर्स न करता, केवळ महाविद्यालयातील संगणकावर स्व-अभ्यास आणि सराव करून ही घवघवीत कामगिरी केली आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रासह इतर राज्यांतील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांमधून आलेल्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. M E T कॉलेज प्रशासनाने या विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी सर्वतोपरी पाठिंबा दिला. स्पर्धेसाठी प्रवास, निवास व सहभाग यासंदर्भातील सर्व व्यवस्थापन महाविद्यालयाकडून करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या Computer Department आणि Faculty Members यांचे मार्गदर्शनही विद्यार्थ्यांना लाभले. उज्वल अहिरराव याने सांगितले की, “आम्ही यापूर्वी कोणताही डिझाईन कोर्स केला नव्हता, परंतु महाविद्यालयातील साधनांचा योग्य वापर करून सतत सराव केला. आमच्या यशामागे आमचे शिक्षक, पालक आणि M E T कॉलेजचे सहकार्य हेच खरे प्रेरणास्थान आहे.” या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत असून, MET BKC च्या वतीने सर्व विजेत्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# सरकारकडे शेतकऱ्यांच्या कर्जमाफी ला पैसे नाहीत, पण सरकारला चांदीच्या ताटात राजेशाही जेवायला पैसे आहेत! - श्री संजय बच्छाव

## शेतकऱ्याचा बाप काढणाऱ्या आ. लोणीकरांचे करायचे काय ?

श्री प्रवीण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



सत्तेचा आणि संपत्तीचा 'माज' आला की माणूस किती मगरुर होतो यांची अनेक उदाहरणे २०१४ नंतर या राज्यातील जनतेने अनुभवली. शेतकर्यांना 'साले' म्हणणारे मा.मंत्री रावसाहेब दानवे, भिकारी म्हणणारे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि आता शेतकर्यांचे कपडे उतरविणारे पातूरचे भाजपा आमदार बबन लोणीकर यांच्या बेलात वक्तव्यांनी राज्यातील शेतकरी संतप्त आहेत. शेतकर्यांच्या आत्महत्या सुरु असतांना सरकारच चांदीचा ताटात जेवत आहे. आणि ज्या अंदाज समितीच्या सदस्यांचे घबाड धुळे विश्राम गृहात सापडले त्यांच्यावर स्तूती सुमने उधळली जात आहेत. त्यामुळे शेतकर्यांच्या 'बाप' काढणार्या लोणीकरांचे करायचे काय ? अशी संतप्त चर्चा आता शेतकर्यांमध्ये रंगू लागली आहे.

पातूरचे भाजपाचे आमदार बबन लोणीकर यांची जीभ पुन्हा घसरली. घसरली म्हणण्यापेक्षा जाणिवपूर्वक शेतकर्यांना बदनाम करण्याचे षडयंत्र या अदानी-अबांनी च्या राज्यात सुरु आहे. रावसाहेब दानवे केंद्रींय मंत्री असतांना त्यांनी जाहीर भाषणात शेतकर्यांना शिव्या दिल्या होत्या. त्यानंतर त्यांनी त्यावर खुलासा करत म्हटले की मी ग्रामीण मराठवाडा शैलीत बोललो. यानंतर राज्याचे विद्यमान कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आपण कोणत्या खात्याचे मंत्री आहेत याचे भान न ठेवता एकदा नव्हे तर दोनदा शेतकर्यांचा अपमान केला. कर्ज माफीच्या पैशातून शेतकरी मुलां-मुलींच्या लग्नात मौज करतात, एक रुपयात सरकार पीक विमा काढते आहे, भिकारी सुध्दा एक रुपया घेत नाही अशा प्रकारची कृषीमत्र्यांची वक्तव्ये ही शेतकर्यांच्या 'अवमान' करणारी होती. आता या बबन लोणीकरांनी तर शेतकर्यांच्या अंगावरचे कपडेच उतरविले आहेत. तुझ्या आईचा पगार लोणीकरांनी केला, तुझ्या बापाची पेन्शन लोणीकरांनी केली, तुझ्या बापाला पेरणीचे पैसे मोदींनी दिले, तुझ्या आईच्या, तुझ्या बहीणीच्या, तुझ्या बायकोच्या खात्यात लाडक्या बहिणीचे पैसे आम्ही टाकले. तुझ्या अंगावरचे कपडे आमच्या सरकारचे आहेत. तुझ्या पायातील चप्पल आणि तु वापरत असलेल्या तुझा मोबाईलचं डबडे आमच्यामुळेच आहे. अशा प्रकारचे वक्तव्य करणारा आणि सत्तेचा व संपत्तीचा माज आलेल्या लोणीकरांच आता करायच काय ? आवर राज्यातील शेतकरी व शेतकरी संघटना संतप्त आहेत. अरे भामटया , शेतकर्याचा फाटलेला बनियान पाहून आणि त्या शेतकर्यांच्या बायकोच्या वर्षभराच्या दोनच साडया पाहुन शैतानाच्या डोळयात सुध्दा 'अश्रु' येतील, आणि तुम्ही शेतकर्यांची आई-बाप बायको बहीण सर्वच जाहीर सभेत काढलीत. लोणीकर तूम्हाला थोडी तरी 'लाज' वाटायला हवी होती. या देशाचे सरन्यायाधिश आणि महाराष्ट्राचे भूषण असलेले या भूषण गवई यांनी सोफिया कुरेशी यांचे बद्दल वक्तव्य करणारा मध्यप्रदेशचा मंत्री विजय शाहची 'लाज' न्यायालयात काढली होती आणि त्याचा माफीनामा सुध्दा फेटाळला आहे, याचे थोडेतरी भान ठेवा. आता जे उन्माद आणि माज आलेले राज्यकर्ते चूकीची वक्तव्ये करतील त्यांचा माफीनामा सुध्दा सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला आहे. म्हणून शेतकर्यांचा माय-बाप काढणार्या लोणीकरांच्या विरोधात शेतकर्यांनी आता न्यायालयातच जाण्याची आवश्यकता आहे. असे होणार नाही तोपर्यंत 'माज' आलेल्या आणि शेतकरी विरोधी मानसिकता असलेल्या या मस्तवालांना लगाम बसणार नाही. हे सरकार शेतकरी विरोधी सरकार आहे यात शंका नाहीच. कारण या राज्याचा कृषीमंत्रीच शेतकर्यांच्या विरोधात वक्तव्य करतात आणि एक रुपये पीक विमा रद्द करुन ती रक्कम मोठया प्रमाणावर वाढवितात, त्यामुळे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी लोणीकरांना सांभाळून घेण्याऐवजी त्यांना चांगल्या शब्दात जाहीर समज दिली पाहिजे. अन्यथा एका आमदाराचे वक्तव्य हे राज्यातील समस्त शेतकरी वर्गाविरोधात असल्याने त्या लोणीकराच्या वक्तव्याचे 'तुप' जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत वाढतांना दिसेल यात शंका नाही. यापूर्वी देखील याच लोणीकरांनी जाहीर कार्यक्रमात एक महिला तहसीलदारांना 'हिरोईन' म्हटले होते. तर २०२४ च्या विधानसभा निवडणूकीतील प्रचारात मराठा आरक्षणाचा मुद्दा पेटलेला असतांना मराठा समाजाची मते ' कांडयावर' मोजण्याइतकी आहेत असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. लोणिकराच्या वक्तव्यावर काँग्रेसचे प्रदेशअध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली असली तरी शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी शपगटातून अजून प्रतिक्रिया उमटलेल्या नाहीत. या राज्यात शेतकरी निसर्गाच्या कोपाने उध्दवस्त झालेला आहे. आणि राज्याकर्ते 'चांदीच्या' ताटात जेवत आहेत. राज्य विधीमंडळात आयोजित अंदाज समितीच्या राष्ट्रीय परिषदेत उपस्थित पाहुण्यांना चांदींच्या ताटात जेवण देत शाही पाहुणचार नुकताच देण्यात आला. अर्थात त्यावर जोरदार टीका झाली असली तरी अदानी - अंबानीच्या या सरकारला त्याचा काही फरक पडत नाही. परंतू अंदाज समितीच्या दौर्याप्रसंगी १ कोटी ८४ लाख २०० रुपयाची रोख रक्कम धुळे येथील गुलमोहर शासकीय विश्रमागृहाच्या १०२ नंबर खोलीत आढळली होती. त्यावर 'लाचार' पोलीस प्रशासनाने साधा एफआयआर देखील दाखल केलेला नाही. परंतू न्यायालयाने आता अदाखलपात्र गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.परंतू याच समितीच्या राष्ट्रीय अधिवेशनात पाहुण्यासाठी चांदीची ताटे वापरल्याने जनेतेच्या मनात 'संताप' निर्माण झाला आहे. काहीच्या मते ही ताटे सोन्याची सुध्दा वापरली जावू शकतात, असा 'अंदाज' घबाड सापडल्यानंतर नागरिकांमध्ये व्यक्त केला जातो आहे. राज्यात दिवसाला सरासरी आठ शेतकरी कर्जामुळे आत्महत्या करीत आहेत. चार वर्षापासून शेतकर्यांना ठिबंक सिंचनचे अनुदान नाही. कंत्रीटी कर्मचार्यांचे चार महिन्यांपासून वेतन नाही. शेतकर्यांच्या नुकसानीचे पंचनामे झालेत परंतू दोन वर्षात झालेल्या अवकाळीची नुकसान भरपाई अद्याप मिळालेली नाही. परंतू मंतासाठी लाडक्या बहीणींना दरमहा ४८ हजार कोटींचे वाटप केले. जाते आहे. तरुणांची तरुणाई संपत चालली तरी त्यांना मागील पांच वर्षात रोजगार मिळाला नाही. कर्मचारी भरती बंद असल्याने सेवानिवृत्त कर्मचार्यांना, शिक्षकांना, वर्ग एक व दोन अधिकार्यांच्या नेमणूका केल्या जात आहेत. अशा विदारक परिस्थितीत शेतकरी उभा राहून पून्हा शेतीत राबतो आहे. आणि लोणीकरांसारखे 'नतद्रष्ट' त्या जगाच्या पेशिद्यांची 'इभ्रत' जाहीर सभेत काढत आहेत. त्यांना शेतकर्यांची माफी मागायची सुध्दा लाज वाटते आहे. अशा लाज सोडलेल्या आमदाराचा महाराष्ट्र राज्य शेतकरी संघटने कडून जाहीर निषेध करत आहे.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# बागलाणची मुलुख मैदानी तोफ श्री. अरविंद सोनवणे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------



मनु मानसी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि महावीर इंटरनॅशनल नाशिक यांच्या संयुक्त विद्दमाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय बहुचर्चित मानाच्या बहुमानांकित सर्वत्र चर्चेत असलेला यंदाच्या सत्तर जीवन गौरव पुरस्कारांमध्ये मानकरी ठरले बागलाण तालुक्यातील सटाणा येथील रहिवासी अनेक वर्ष नगर पालिकेच्या अनेक पदांवर कार्यरत राहिलेले, शेती माती आणि राजकारणात सक्रिय आघाडीवर असलेले स्पष्ट निर्भिड व्यक्तिमत्व, जीवास जीव देणारे उबाटा सेनेचे बागलाण तालुका प्रमुख बागलाणची मुलुखमैदानी तोफ अरविंदजी सोनवणे उर्फ साहेब यांना रविवार दिनांक २९ / ०६ / २०२५ रोजी नाशिकच्या कर्मभूमीत द पवार गार्डन येथे मा. डॉ. शेफालीताई भूजबळ चिफ ॲडमिस्ट्रेटर भूजबळ कॉलेज नाशिक, मा. श्री सुनिल पवार पोलिस निरिक्षक क्राईम पंचवटी पो. स्टे. , मा. श्री एम. आर. डावरे डायरेक्टर लायन्स क्लब ऑफ नाशिक शहर , मा. डॉ. विठ्ठलसिंग ढाकरे . प्राध्यापक हिंदी विभाग अध्यक्ष, मा. महंत श्री डॉ. भक्ति चरणदासजी महाराज अ. भा. आखाडा परिषद राष्ट्रीय प्रवक्ते यांचे हस्ते व संस्थेच्या संस्थापिका सौ. मेघा शिंपी, कार्याध्यक्ष श्रीमती मंजुताई जाखाडी, मा. डॉ. अनिल नहार अध्यक्ष महावीर इंटर नॅशनल यांच्या उपस्थितीत, शेकडो साहित्यिकांच्या टाळयांच्या गजरात जीवन गौरव पुरस्कार २०२५ देऊन गौरविण्यात आले. अरविंदजी सोनवणे साहेबांना या आधीही अनेक मानाच्या संस्थांचे पुरस्कार मिळाले आहेत. साहेबांचा गौरव हा त्यांच्या कार्याचा गौरव समाजाचा गौरव आहे. अशा प्रतिक्रिया राजकीय सामाजिक साहित्य क्षेत्रात उमटत आहेत. विशेष म्हणजे वयाच्या एकसष्टीत जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने सर्वच क्षेत्रातून सर्वत्रआनंद व्यक्त होत आहे. त्यांचे गावकुसाचे मित्रवर्य गावगाडाकार साहेबराव नंदन तात्यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

# संतोष द्याडे यांना पीएच.डी. प्रदान

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
----------------------------
-



अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी संतोष रविंद अप्पा द्याडे यानी " मराठवाडयातील आदिवासी विकास प्रकल्पा अंतर्गत येणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्याची क्रीडा संपादणूक व क्रीडा विषयक सोयी सुविधा: एक अभ्यास" या विषयावर पीएच डी प्राप्त केली असुन संशोधन मार्गदर्शक म्हणून डॉ. बी. डी. केंगले शिक्षणशास्त्र संकुल, स्वा. रा. तीर्थ. म. विद्यापीठ, नांदेड यानी कार्य केले आहे प्राप्त झाल्याबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ. कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य नारायणराव मैलागिरे, सूर्यकांत नारलावार, देवेंद्र मोतेवार गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ , उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य डॉ व्ही जी शेरीकर , पर्यवेक्षक संग्राम पाटील , कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक , कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आभिनंदन केले आहे

# जायंटस ग्रुप कडून सावतानगर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहीत्य भेट

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------



नांदगांव शहरातील जायंटस् ग्रुप ऑफ नांदगांव आणि जायंटस् ग्रुप ऑफ नांदगांव सहेली या सामजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमानाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावतानगर येथिल शाळेतील गरजु विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व मिष्ठांत वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरवातीस मुला मुलीनी स्वागत गीत सादर केले त्यानंतर सरस्वती देवतेच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. मुख्याध्यापकांच्या हस्ते आलेल्या सर्व मानवेतराचे स्वागत व सत्कार करण्यात आला. जायंटस ग्रुप या सामाजिक संस्थेच्या बाबतीत सविस्तर . माहीती देण्यात आली ग्रुपचे अध्यक्ष श्री.सोमनाथ दुसाने व अध्यक्षा सौ. वैशाली दुसाने यांचे शुभ हस्ते पाटी, पेन्सिल इ.साहित्य वाटण्यात आले त्याच बरोबर चॉकलेट व मिठाईचे वाटप करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांनी आले मनोगत व्यक्त केले. मा.मुख्यधापिकांनी आलेल्या सर्वांचे आभार मानले. या कार्यकमास ग्रुपचे अध्यक्ष व अध्यक्षा वैशाली दुसाने यांचे बरोबर सुमित गुप्ता , बळवंत शिन्दे , रामनिवास करवा, भारती बोरसे , पुष्पा दुसाने, शुकुंतला शिन्दे मुख्याध्यापिका सौ. ज्योतीताई पाटील , दीपिका मोकळ, शाईन शेख, वेदना मोकळ, कल्पना मोकळ व इतन सदस्य उपस्थित होते.

# पतसंस्थेत तारण ठेवलेल्या कापसाची परस्पर विक्री

## मनमाड येथील वखार महामंडळाच्या अधिक्षकासह सहा जणावर गुन्हा दाखल

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराजदूत
---------------------

श्रीरामपूर येथील अंबिका महिला नागरी सहकारी पतसंस्थेची तब्बल ७ कोटी ४४ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी मनमाड येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या साठा अधीक्षकासह सहा जणांवर फसवणुकीचा गुन्हा मनमाड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार आण्णासाहेब कचरू जाधव (वय ५६, रा. श्रीरामपूर) हे अंबिका महिला पतसंस्थेचे व्यवस्थापक असून, त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणात उद्योजकांबरोबरच वखार महामंडळातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने झालेल्या घोटाळयाचा पर्दाफाश झाला आहे. श्रीरामपूर येथील श्री बालाजी ऑईल मिल या फर्मचे भागीदार रायभान नाथु बावके, महेश दत्तात्रय मगर, प्रशांत ज्ञानेश्वर कासार असून, सागर रघुनाथ बावके हे फर्मचे अधिकृत प्रतिनिधी होते. या फर्मने विविध ठिकाणांहून कापूस खरेदी करून तो मनमाड येथील वखार महामंडळाच्या गोदामात साठवून तारण कर्जासाठी वापरला. फर्मने २०२३ पासून सुमारे ७००० कापूस गाठी वखार महामंडळाच्या मनमाड येथील गोदामात ठेवून, त्यावरील तारणाखाली ३१२ कर्ज प्रकरणांद्वारे एकूण १६.४० कोटी रुपये कर्ज अंबिका पतसंस्थेपासून घेतले. ३१२ पैकी २०६ कर्ज प्रकरणांची परतफेड झाली असून संबंधित गाठी परत घेतल्या गेल्या, मात्र उर्वरित १०६ कर्ज प्रकरणांतील २६५० गाठी अजूनही तारणाखाली होत्या. या गाठींवरील थकीत कर्जाची रक्कम होती ७.१४ कोटी रुपये.

फेब्रुवारी २०२५ मध्ये अंबिका पतसंस्थेने मूळ पावत्यांचे नुतनीकरणासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या मनमाड व नाशिक कार्यालयांकडे पाठवले होते. मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी या पावत्या परत न करता गाठी सुरक्षित असल्याचा खोटा अहवाल दिला.

त्यानंतर पतसंस्थेचे कर्मचारी गोदामात पाहणीसाठी गेले तेव्हा साठा अधिक्षक प्रल्हाद अंबालाल चौधरी आणि तत्कालीन व्यवस्थापकांनी पाहणीस विरोध केला.

फेब्रुवारीमध्ये तपासणी केल्यानंतर धक्कादायक बाब समोर आली२६५० गाठींपैकी तब्बल २६२५ कापूस गाठी तारणाखाली असताना परस्पर विकल्या गेल्या होत्या. ही विक्री पतसंस्थेच्या संमतीशिवाय आणि नियमबाह्य पद्धतीने करण्यात आली होती.

या सहा जणावर गुन्हा दाखल

श्री बालाजी ऑईल मिलचे भागीदार रायभान नाथु बावके , महेश दत्तात्रय मगर, प्रशांत ज्ञानेश्वर कासार, सागर रघुनाथ बावके, मनमाडच्या महाराष्ट्र राज्य वखार महामंडळचे साठा अधीक्षक प्रल्हाद अंबालाल चौधरी, वखार महामंडळ नाशिकचे तत्कालीन व्यवस्थापक या सहा जणांविरोधात फसवणुकीसह विविध कलमांव्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक विजय करे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मधुकर उंबरे हे तपास करत आहे.

या प्रकारामुळे अंबिका महिला पतसंस्थेचे ठेवीदार प्रचंड चिंतेत असून, संस्थेच्या निधीवरील संभाव्य धोका पाहता संस्थेवरील विश्वासाला तडा गेला आहे. पोलिसांनी तपास सुरू केला असून, इतक्या मोठ्या घोटाळयाच्या पार्श्वभूमीवर वखार महामंडळाच्या कार्यपद्धतीवर व पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# शिवसेना संपर्कप्रमुख चंद्रकांत रघुवंशींच्या पाठपुरावा; गुजरातचे उद्योग येणार महाराष्ट्रात

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------------





नवापूर एमआयडीसीत उच्च क्षमतेच्या वीज जोडणीला मान्यता शहरालगत असलेल्या एमआयडीसी मध्ये पायाभूत सुविधा अंतर्गत उद्योग धंदा साठी उच्च क्षमतेचे विद्युत रोहित्र मंजूर झाले असून, त्याची जोडणी करण्यास मान्यता मिळालेली आहे . याबाबत शिवसेनेचे संपर्कप्रमुख आमदार चंद्रकांत रघुवंशीयांनी नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करून मागणी केली होती .उच्च क्षमतेच्या विद्युतीकरण्यामुळे गुजरातचे उद्योग महाराष्ट्रात अर्थातच नागपूर एमआयडीसीत येतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना संपर्कप्रमुख आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या निवेदनाची दखल घेतलेली आहे .

देशाच्या कानाकोपऱ्यातून उद्योजकांनी महाराष्ट्रात येऊन उद्योग सुरू करावे म्हणून महाराष्ट्र शासन प्रोत्साहन पर धोरण राबवीत आहे. त्यांचाच एक भाग म्हणून नवापूर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये मोठ्या प्रमाणावर गुजरातचे उद्योजक हे नवापूरएमआयडीसीमध्ये उद्योग सुरू करण्यासाठी प्रेरित झाले आहेत.

परंतु ,या ठिकाणी एमआयडीसी मध्ये मोठे उद्योग प्रकल्प येत असतांना पायाभूत सुविधा म्हणजेच विद्युत जोडणी उद्योजकांना मिळत नसल्याने त्या उद्योजकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता . विज जोडणी मिळत नसल्याने सुरतच्या उद्योजकांना उद्योग सुरू करण्याचा कल थांबाला होता .

नवापूरचा एमआयडीसी मध्ये येणाऱ्या उद्योजकांना जर विद्युत जोडणी उपलब्ध करून दिल्यास गुजरात राज्यातील टेक्सस्टाईल उद्योग मोठ्या प्रमाणावर येण्यास तयार त्यांनी शिवसेना संपर्कप्रमुख आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्याशी चर्चा केली होती . त्यानंतर आमदार रघुवंशी यांनी एमआयडीसी मध्ये वीज जोडणी करण्याबाबतची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व वीज मंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन देत मागणी केली होती . एमआयडीसीत उच्च क्षमतेचे विद्युत रोहित्र मंजूर झाले असून, विज जोडणीच्या कामाला मंजुरी मिळालेली आहे. दरम्यान विद्युत रोहित्र जोडणीमुळे गुजरातचे उद्योग महाराष्ट्रात अर्थातच नागपूर एमआयडीसीत येतील. त्यामुळे स्थानिकांच्या रोजगारांच्या प्रश्न सुटणार आहे.

# मविप्र संस्थेचे जनता विद्यालय भालूर येथे तैलचित्र अनावरण

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------




मराठा विद्या प्रसारक समाजाचे, अभिनव बालविकास मंदिर, जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, भालूर. येथे तैलचित्र अनावरण आणि दप्तर वितरण सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. या विशेष कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने झाली. यानंतर मविप्र नांदगाव तालुका संचालक अमितभाऊ बोरसे पाटील आणि कापसे पैठणी व कापसे फाउंडेशन संचालिका सौ.वंदनाताई कापसे व कुमारी नुपूर कापसे यांच्या हस्ते महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि विद्येची देवता सरस्वती माता यांचे भव्य तैलचित्राचे अनावरण करण्यात आले. त्यांनी आपल्या कार्याने शाळेच्या व विद्यार्थी घडविण्याच्या कार्यात मोठे योगदान दिले असल्याची गौरवोद्गार उपस्थितांनी काढले. यानंतर विद्यार्थ्यांना मोफत दप्तरांचे वाटप करण्यात आले. सर्व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्याचे वितरण झाले. यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक सुलभ होणार आहे.

त्याचप्रमाणे संचालक अमितभाऊ बोरसे-पाटील यांनी मराठा विद्या प्रसारक समाज संस्था कशा रीतीने कर्मवीरांच्या त्यागातून व सहाय्यातून उभी झाली व आज महाराष्ट्रातील अग्रगन्य बनली हे सांगितले . तसेच कुमारी नुपूर कापसे यांनी देखील त्यांच्या वडिलांचे म्हणजेच बाळासाहेब कापसे यांचे जूने शिक्षणाविषयीचे अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले.तसेच कापसे फाउंडेशन मध्ये अपंग गरजू व होतकरू व्यक्तींना कशाप्रकारे रोजगार मिळवून देऊन विशेष असे सहाय्य केले जाते हें देखील समजले.

या कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष कचरु आहेर, धनाजी जठार व सर्व सदस्य, सर्व ग्रामस्थ आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. योगिता आहीरराव यांनी केले व आभार प्रदर्शन श्रीमती तासकर यांनी केले. पालक, विद्यार्थी व ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद या सोहळयासाठी लाभला.

# राजीनामा स्वीकारण्यासाठी जिल्हाधिकारी चक्क रात्री ११ वाजता हजर

## विरोधी पक्षाच्या लोकांना भेटण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना वेळ नाही मात्र सत्ताधारी पक्षासाठी रात्री ११ वाजता हजर

## साक्री नगराध्यक्ष सह उपनगराध्यक्ष स्वीकृत नगरसेवकांचा राजीनामा स्वीकारला.

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------



राज्यात पहाटेचा शपथविधी सर्वश्रुत आहे. आजही या शपथविधीची खमंग चर्चा होते. असाच प्रकार आता धुळयात घडला आहे साक्री नगराध्यक्षासह उपराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांचा राजीनामा स्वीकारण्यासाठी जिल्हाधिकारी चक्क रात्री ११ वाजता कलेक्टर कचेरीत आले. त्यांनी आपल्या दालनात बैठक घेऊन सर्वांचे राजीनामा स्वीकारले. मात्र, याबाबत कमालीची गोपनीयता पाहण्यात आली हे विशेष.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुंबईत साक्रीच्या नगराध्यक्ष जयश्री पवार उपनगरअध्यक्ष बापू गीते व स्वीकृत नगरसेवक ॲड पूनम काकुस्ते यांच्याकडून राजीनामा घेतले होते. सदर राजीनामा जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने स्वीकारावा यासाठी नामदार बावनकुळे यांनी कालच धुळे जिल्हाधिकाऱ्यांना फोनही केला होता त्यानुसार साक्री नगरपंचायतचे पदाधिकारी व नगरसेवक मुंबईहून डोळयाकडे रवाना झाले. धुळयात आल्यानंतर ते रात्री दहा वाजता जिल्हाधिकार्यालयात दाखल झाले यावेळी त्यांचा राजीनामा स्वीकारण्यासाठी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनीही जिल्हाधिक कार्यालयात हजेरी लावली. यावेळी नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष व श्रीकृत नगरसेवकासह भाजपाचे सर्व नगरसेवक तसेच ज्येष्ठ नेते प्राध्यापक अरविंद जाधव हे देखील उपस्थित होते. रात्री ११ वाजता जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात चर्चा झाल्यानंतर राजीनामा स्वीकारण्यात आले मात्र नियमांचे उल्लंघन होईल या भीतीने पदाधिकाऱ्यांनी कोणतीही माहिती देणे टाळले. दरम्यान गेल्याच आठवड्यात विरोधकासह आमदार मंजुळा ताई यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पायऱ्यांवर बसून आंदोलन केले होते. तीन तास आंदोलन करूनही जिल्हाधिकारी त्यांना भेटल्या नाहीत मात्र सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांचा राजीनामा स्वीकारण्यासाठी जिल्हाधिकारी रात्री अकरा वाजता आल्या. "जिल्हाधिकाऱ्यांकडे विरोधी पक्षाच्या लोकांना भेटण्यासाठी वेळ नाही मात्र सत्ताधारी पक्षासाठी अधिकारी २४ तास हजर राहतात असा संदेश यानिमित्त पुन्हा एकदा गेला". यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७